# लहान मुलांच्या हस्तकलेला मिळाली संधी!

## मित्रमेळा, आसमंतचा उपक्रम : 'चला साकारू गणराय' स्पर्धा

सकाळ वृत्तसेवा

राजापूर, ता. २३ : प्रत्येकाकडे कलागुण असतात; मात्र त्याला व्यक्त होण्याची योग्य वेळी संधी मिळाल्यास ती व्यक्ती प्रभावशाली बनते. मुलांना बालवयातच त्यांचे अंगभूत कलागुण व्यक्त करण्याची संधी मिळणे गरजेचे असते. याच उद्देशाने मित्रमेळा, राजापूर आणि आसमंत, रत्नागिरी यांनी 'चला साकारू गणराय' हा उपक्रम आयोजित केला होता. यामध्ये सहभागी होत मुलांनी शाडू मातीला आकार देत हुबेहूब गणपती साकारून कलेची प्रचिती दिली. गणेशमूर्ती तयार करण्याच्या स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले.

लहान मुलांच्या कलागुणांना वाव देताना शाडूच्या मूर्ती साकारून त्याद्वारे साऱ्यांना पर्यावरणाचा संदेश जावा आदी उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. शहरातील श्री मारुती मंदिरच्या सभागृहात गणपती बनविण्याची स्पर्धा झाली. आयोजकांनी मुलांना शाडूची माती उपलब्ध करून दिली होती. शाडू मातीच्या साह्याने सहभागी मुलांनी काही मिनिटांच्या कालावधीमध्ये अनेक हुबेहूब गणपती मूर्ती साकारल्या. मुले एकाग्रचित्ताने मूर्ती तयार करीत होते. मुलांनी आपल्या कल्पनाशक्ती आणि चिकित्सक वृत्तीने गणेशमूर्ती साकारून आपल्या कलेला वाव दिला. या मुलांच्या कौशल्याचे साऱ्यांनीच कौतुक केले.

**स्पर्धेचा निकाल**

(प्रथम तीन क्रमांक) : प्रथम गट : अथर्व बाणे, आशीष बंडबे, प्रणय गिरकर, द्वितीय गट : भूषण आचरेकर, यश बाईत, ओंकार बंडबे, तृतीय गट : देवाशिष नवरे, ओम सुर्वे, निहीर पंगेरकर. यशस्वी स्पर्धकांना बक्षिसे देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. परीक्षक म्हणून संस्कृती फाउंडेशनचे अध्यक्ष व कलाशिक्षक राजेश गोसावी आणि मूर्तिकार नरेश पांचाळ यांनी काम पाहिले.



राजापूर : मित्रमेळा आणि आसमंत यांच्यातर्फे आयोजित स्पर्धेत गणेशमूर्ती साकारण्यात मग्न असलेले छोटे कलाकार.